संक्षिप्त वृत्त

संगम येथील आरोग्य शिबिरात १७३ रुग्णांची तपासणी

माळशिरस : संगम (ता. माळशिरस) येथे ग्रामपंचायत संगम आणि पुणे अंधजन मंडळाचे एच. व्ही. देसाई आय. हॉस्पिटल मोहम्मदवाडी पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी, मोतिबिंदू शस्त्रक्रिया, शुगर तपासणी, रक्तदाब तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात संगम आणि परिसरातील जवळपास १७३ ग्रामस्थांची तपासणी करण्यात आली. या शिबिरात आवश्यक नागरिकांना मोफत चष्मा वाटप करण्यात आले. तसेच आवश्यक शस्त्रक्रिया संदर्भात नोंदणी करण्यात आली. यावेळी संगम ग्रामपंचायतीचे सरपंच नारायणराव ताटे-देशमुख, उपसरपंच दशरथ महाडिक-पाटील,नेत्र चिकित्सक डॉ. जावेद तांबोळी, केशवराव ताटे-देशमुख, ग्रामसेवक ज्ञानदेव जाधव, प्रमोद माने-देशमुख, चंद्रकांत महाडिक-पाटील, विठ्ठल ताटे देशमुख, प्रशांत ताटे-देशमुख, पोलीस पाटील तेजस्वी दळवी, विक्रम ठोकळे, नितीन ठोकळे, गणेश भोसले आदी उपस्थित होते.

दहा मोटरसायकली जप्त

सोलापूर : ग्रामीण पोलीस दलातील स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने एका रेकॉर्डवरील चोरट्याला अटक करून चोरीस गेलेल्या १० मोटरसायकली जप्त केले. जप्त केलेल्या मोटरसायकलींची किंमत २ लाख ९० हजार इतकी असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. राहुल वामन सीताप-कोळी (रा. माळशिरस) असे अटक केलेल्या चोरट्याचे नाव आहे. तो माळशिरस ते अकलूज रोडवरील कोंडभावी येथे येणार असल्याची गुप्त माहिती गुन्हे शाखेचे निरीक्षक सुरेश निंबाळकर यांना मिळाली. त्याप्रमाणे सहायक निरीक्षक शेळके, फौजदार ख्वाजा मुजावर, सहाय्यक फौजदार विजय शिंदे, शेळके, नारायण गोलेकर, सलीम बागवान आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी त्याला शिताफीने अटक केली. तेंव्हा त्याच्याजवळ आढळलेली दुचाकी टेंभुर्णी पोलीस परिसरातून चोरीस गेल्याचे आढळून आले. पोलिसांनी आणखी तपास केला असता त्याच्याकडे १० चोरीच्या मोटरसायकली आढळून आल्या. त्या मोटरसायकली टेंभुर्णी, माढा, मोहोळ, सांगोला, इंदापूर आणि लोणंद येथील असल्याचे समजले. अटकेतील आरोपी टेंभुर्णी पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे

पेट्रोलच्या भडक्याने इसम जखमी

सोलापूर : घरासमोरचे गवत पेट्रोल ओतून जाळत असताना झालेल्या भडक्यात ५५ वर्षीय इसम भाजून जखमी झाला . ही घटना लोणविरे (ता. सांगोली) येथे शनिवारी सकाळच्या सुमारास घडली. राहुल लक्ष्मण दोडके (वय ५५ रा. लोणविरे) असे भाजलेल्या इसमाचे नाव आहे. त्यांना सांगोला येथे प्राथमिक उपचार करून रोहन (मुलगा) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले. शनिवारी स. ६ च्या सुमारास राहुल दोडके हे घरासमोरील गवतावर पेट्रोल ओतून आग लावली होती. त्यावेळी आगीचा भडका उडाल्याने ते भाजून जखमी झाले, अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

भाजलेल्या वृद्ध महिलेचा मृत्यू

सोलापूर : चुलीवर स्वयंपाक करताना भाजून जखमी झालेल्या वज्रेश्वरी शहाजी शिंदे (वय ६५, रा. रमाबाई आंबेडकर नगर) या शासकीय रुग्णालयात उपचार घेताना शुक्रवारी रात्री मयत झाल्या. त्या सोमवारी दुपारी राहते घरात स्वयंपाकासाठी चूल पेटवत होते. त्यावेळी अंगावरील कपडे पेटल्याने त्या भाजून जखमी झाल्या होत्या. त्यांना लक्ष्मी पवार (भावजय) यांनी रुग्णालयात दाखल केले होते. या घटनेची नोंद जोडभावीपेठ परिसरात झाली आहे.

लोखंडी रॉडने मारहाण

सोलापूर : घरातून बोलावून घेऊन लोखंडी रॉड, काठी आणि लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत २३ वर्षीय तरुण जखमी झाला. ही घटना कुर्डू (ता. माढा) येथील बस स्थानकाजवळ शुक्रवारी रात्रीच्या सुमारास घडली. अमोल रोहिदास धोत्रे (वय वर्षे २३, रा. कुर्डू) असे जखमीचे नाव आहे. त्याला कुर्डवाडी येथे प्राथमिक उपचार करून शोभा (आई) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले. शुक्रवारी रात्री ८च्या सुमारास त्याला फोन केल्यामुळे तो कुर्डू स्टॅन्ड जवळील पान टपरीजवळ आला होता. त्यावेळी अण्णा ढाले आणि इतर १० ते १२ जणांनी मिळून त्याला मारहाण केली,अशी प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

क्रीडा दिनानिमित्त स्पर्धांचे आयोजन

सोलापूर : क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय सोलापूरद्वारा मेजर ध्यानचंद यांच्या जन्मदिनानिमित्त २६ ते ३१ ऑगस्ट या कालावधीत विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आलेले आहे. दि. २९ ऑगस्ट रोजी सर्व शाळा/महाविद्यालये, क्रीडा मंडळे व क्रीडा संघटना यांनी क्रीडा दिनाचे व्यापक स्वरुपात आयोजन करण्यात यावे, २६ ते ३१ ऑगस्ट कालावधीत आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमांच्या आयोजनाची नोंद फिट इंडिया पोर्टलवर अपलोड करावी, असे आवाहन नरेंद्र पवार जिल्हा क्रीडा अधिकारी सोलापूर यांनी केले आहे.

माढा तालुका कृषी विभागातर्फे रानबाजार महोत्सव

माढा/प्रतिनिधी

जागतिक आदिवासी दिनानिमित्त प्रकल्प संचालक आत्मा, सोलापूर व तालुका कृषी अधिकारी माढा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या रानभाजी महोत्सवात उद्घाटन माढा तालुक्याचे आमदार बबनराव शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.

या महोत्सवात चिघळ, पाथरी, अळू, कडवंची, तोंडली, तांदूळजा व तत्सम ३२ प्रकारच्या रानभाज्या तालुक्यातील शेतकऱ्यांकडून व विविध बचत गटांकडून प्रदर्शनात मांडून त्याबाबत शेतकऱ्यांना महत्त्व पटवून देण्यात आले.यावेळी प्रदर्शनात मांडलेल्या रानभाज्या खरेदी करण्यासाठी सर्वसामान्य नागरिकांतून एकच गर्दी केल्याची दिसून आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी आ. बबनराव शिंदे हे होते.

तालुका कृषी अधिकारी माढा व प्रकल्प संचालक आत्मा सोलापूर यांच्यावतीने कुर्डूवाडी पंचायत समिती येथील सभागृहात रानभाज्या महोत्सवाचे शुक्रवारी सकाळी ११ वाजता आयोजन करण्यात आले होते. याचे उद्घाटन आ. बबनराव शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी तालुका कृषी अधिकारी बी. डी. कदम, मंडल कृषी अधिकारी विजय जाधव, विशाल गावडे, शंकर मिरगणे, हनुमंत बोराटे, कृषी पर्यवेक्षक संजय पाटील, एमएसआरएलएमचे समन्वयक अवधूत देशमुख यांच्यासह इतर मान्यवर होते.

यावेळी गणेश सावंत (उपळाई खु), सुरेश राऊत (अंजनगाव उ), बाळासाहेब माने, दत्तात्रेय साळुंखे, विष्णु केचे, (आलेगाव खु.), स्वाती कदम (अकुलगाव), श्रीकृष्ण रुपनवर (चांदज), अरुण जगताप (कुर्डूवाडी), युवराज गव्हाणे यांच्याबरोबर संजीवन गट टेंभुर्णी, माढेश्वरी शेतकरी उत्पादक कंपनी बेंबळे, मणकर्णीका शेतकरी उत्पादक कंपनी अंजनगाव (उ)या बचत गटांचाही उल्लेखनिय कामगिरी केल्यामुळे मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

यावेळी तालुक्यातील नागरिक शेतकरी व विविध बचत गटाच्या महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक बी. डी. कदम यांनी तर सूत्रसंचालन संजय पाटील यांनी तर आभार आनंद झिने यांनी केले.

रानभाजी महोत्सवात रानभाज्यांच्या प्रदर्शनाची पाहणी करताना आ. बबनराव शिंदे व कृषी विभागातील अधिकारी वर्ग.

मंगळवेढ्याच्या वीज वितरण कारभाराची ऐशी-तैशी

सतत वीज गायब होत असल्याने नागरिकांमधून तीव्र संताप

मंगळवेढा/प्रतिनिधी

मंगळवेढा येथील वीज वितरण कार्यालयात वरिष्ठ अधिकारी कार्यरत नसल्याने येथील कामाकाजाची ऐसी-तैसी सुरु असून शहरात रात्रंदिवस तासातासाला वीज गायब होत असल्याने शहरवासीयांमधून या कामकाजाबाबत तीव्र संताप व्यक्त होत असून नागरिक संतापून आंदोलनाच्या पावित्र्यात असल्याची चर्चा आहे.

मंगळवेढा शहरातील वीज वितरण कार्यालयातील उपकार्यकारी अभियंता पाटील यांची बदली कोल्हापूरला झाल्याने आत्तापर्यंत हे पद रिक्तच आहे. जबाबदार अधिकारी येथे नसल्यामुळे येथील कामकाजाची ऐसी तैसी सुरु असल्याने याचा ग्राहक त्रास तमाम जनतेला सोसावा लागतो आहे. येथील तत्कालीन अधिकारी बाळासो चोरमले यांची बदली गतवर्षी झाल्यानंतर पूर्ण वेळ अद्यापही मंगळवेढ्याला अधिकारी मिळालाच नाही. त्यांच्या बदलीनंतर पंढरपूर कार्यालयाकडील पाटील यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार देण्यात आला होता. त्यांचीही बदली मागील दोन आठवड्यापूर्वी झाली आहे. शहर कनिष्ठ अभियंता कोळेकर यांची बदली कोकणात झाल्याने त्यांचा कार्यभार बोराळे उपकेंद्राचे कांबळे यांच्याकडे अतिरिक्त भार दिला आहे. मात्र त्यांनाही मंगळवेढ्याचा भार सोसवेना झाल्यामुळे शहरातील वीज तासा-तासाला गायब होत असल्याने नागरिक आक्रमक बनले आहेत. यापूर्वी सतत जाणाऱ्या विजेला कंटाळून विविध पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी अधिकाऱ्याच्या तोंडाला काळे फासण्याचा इशारा देताच त्या अधिकार्यांनी बदली करुन पळ काढल्याची खमंग चर्चा सुरु आहे. नागरिकांना विजेची सेवा सुरळीत न दिल्यास भविष्यात काळे फासण्याचा प्रकार घडण्याची शक्यता नाकारता येणार नसल्याच्या तिखट प्रतिक्रीया नागरिकांमधून व्यक्त होत आहे. परिणामी वीज पुरवठा सुरळीत दिल्यास हे संकट निश्चितपणे टळू शकते, अशाही भावना सुज्ञ नागरिकांमधून व्यक्त होत आहेत.

रोड रॉबरी प्रकरणी दोघे जेरबंद; अवघ्या २४ तासात मुसक्या आवळल्या

एमआयडीसी गुन्हे प्रकटीकरण पथकाची धडाकेबाज कामगिरी

सोलापूर/प्रतिनिधी

सुरज ऊर्फ एकव्या खंडू जगताप (वय २४ वर्षे रा. हनुमान नगर, रूपाभवानी मंदिर जवळ, सोलापूर), बाळया ऊर्फ अविनाश शिवाजी चव्हाण (वय २१ वर्षे रा. गणेश नगर, मंत्री चंडक आंगण शेजारी, सोलापूर) असे आहे. तसेच संशयीत आरोपी बाळया ऊर्फ अविनाश शिवाजी चव्हाण हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असुन त्याच्यावर यापुर्वी घरफोडीचे २ गुन्हे दाखल आहेत. रोड रॉबरी प्रकरणी या दोघां आरोपींच्याकडून त्यांच्याकडून एक मोवाईल, रोख रक्कम ३८ हजार रुपये व गुन्हयात वापरलेला चाकु असा एकुण ४८ हजार किंमतीचा मुद्देमाल पोलीसांनी हस्तगत केला आहे. रोड रॉबरी चा गुन्हा २४ तासाचे आत उघडकीस आणला आहे. या रोड रॉबरी प्रकरणी एमआयडीसी डीबीच्या पथकानी या दोघांच्या मुसक्या आवळून त्यांना जेरबंद केले आहे.

ही कामगिरी पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस उप-आयुक्त (परि.) विजय कबाडे, सहा. पोलीस आयुक्त अशोक तोरडमल यांच्या मार्गदर्शनाखाली वपोनि. प्रमोद वायमारे, पोनि.विजय खोमणे, यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि/भरत चंदनशिव पोहेकॉ राकेश पाटील, पोहेको एकनाथ उबाळे, पोहेकों/दिपक डोके, पोहेकों.सचिन भांगे, पोना.मंगेश गायकवाड, पोकों.शैलेश स्वामी, पोकों.अमसिध्द निवाळ, पोकों.अमोल यादव, पोकों. काशिनाथ वाघे, पोकों.अविनाश डिगोळे, पोकों.अमर शिवसिंगवाले, पोकों.सुहास अर्जुन, पोकों.शंकर याळगी, पोकों.देवीदास कदम, पोकों.माने यांनी बजावली आहे.

५ मृत गटसचिवांच्या वारसांना धनादेश वाटप, निवृत्तीनंतरचे फायदेही मिळणार

मृत गटसचिवांच्या वारसांना धनादेश उपनिबंधक किरण गायकवाड यांच्या हस्ते वाटप करताना सहायक उपनिबंधक आबासाहेब गावडे, जिल्हाध्यक्ष जयकुमार जगताप, उमेश पवार आदी मान्यवर.

उत्तर सोलापूर/प्रतिनिधी

कोणाचे निधन पाच वर्षांपूर्वी तर कोणाचे निधन दोन वर्षापूर्वी झालेले. शेवटचा पगार निघाला नाही म्हणून त्यांना ग्रॅच्युइटी, रजेचा पगार, कॅश सिक्युरिटी नाही, निवृत्ती वेतनही नाही. ही सत्य कथा आहे ग्राम पातळीवरील सहकारी सोसायटीचा कारभार सांभाळणाऱ्या पाच मयत गटसचिवांच्या वारसांची. प्रश्न अवघड होता, मृताच्या कुटुंबीयांच्या उदरनिर्वाह, पोटा- पाण्याचा प्रश्न मोठा होता. दुःखदायक घटना ऐकताच डोळे पाणावले आणि अधिकारी म्हणून पदभार सांभाळणाऱ्या जिल्हा उपनिबंधक तथा जिल्हास्तरीय गट अध्यक्ष किरण गायकवाड यांना मायेचा पाझर फुटला. २ ते ५ वर्षांपूर्वी मयत झालेल्या सचिवांच्या पत्नीस आणि इतर वारसांना आज शेवटचा पगार दिला. पेन्शन, ग्रॅच्युइटी, रजेचा पगार देण्यासाठी अडथळे दूर झाल्याने हा मार्ग मोकळा झाला. करमाळा-स्व. संतोष थोरबोले, बार्शी-स्व. भीमराव जगताप, माढा-स्व. भाऊसाहेब गायकवाड, मंगळवेढा-स्व. शिवाजी चव्हाण, स्व. जीवन शिंदे यांना शेवटच्या पगारी सोबतच ग्रॅज्युटी, पेन्शन आणि रजेचा पगार देखील मिळणार असल्याने प्रत्येकाच्या डोळ्यात आलेले पाणी उपनिबंधक किरण गायकवाड यांनी पुसले आहे. यावेळी गटसचिव संघटना जिल्हाध्यक्ष जयकुमार जगताप, सहायक उपनिबंधक आबासाहेब गावडे यांच्या प्रमुख उपस्थितीत मृत गटसचिवांच्या वारसांना धनादेश वाटप करण्यात आले.

मृत वारसांची गेल्या पाच वर्षांपासून पगार आणि देय असलेली रक्कम, निवृत्ती नंतरचे फायदे मिळावे म्हणून संघर्ष सुरू होता. या संघर्षला पूर्णविराम मिळाला आहे. मयत गटसचिवांचा प्रश्न सोडविण्यासाठी अडचणी निर्माण होत होती. सचिव ज्या विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेत कार्यरत होते, त्या संस्थेने संयुक्त खर्च वर्गणी (जॉय) भरणे आवश्यक होते. हा खर्च सादर होत नसल्याने जिल्हा उपनिबंधक गायकवाड यांनी देखरेख संघातील रक्कम देऊन हा जटिल प्रश्न सोडविला आहे. मयत गटसचिवांच्या वारसांना जिल्हा उपनिबंधक कार्यालयात धनादेश प्रदान करण्यात आला.

यावेळी जिल्हा देखरेख संघाचे सचिव तथा सहायक निबंधक उमेश पवार, जिल्हा देखरेख संघाचे प्रशासक तथा सहायक निबंधक आबासाहेब गावडे, गटसचिव संघटनेचे जिल्हाध्यक्ष जयकुमार जगताप, गटसचिव पतसंस्थेचे बबन मेहेर, जिल्हास्तरीय समितीचे सदस्य नारायण गुंड, सोमशंकर करजोळे उपस्थित होते.

कुटुंबातील कमावता माणूस गेला की त्यांच्या कुटुंबाचे फार मोठे आर्थिक नुकसान तर होतेच पण मानसिक संतुलन देखील बिघडते. ज्या गटसचिवने संस्था वाढावी म्हणून गाव पातळीवर अहोरात्र योगदान दिले, माणुसकी म्हणून किंवा अधिकाराचे उत्तर दायित्व म्हणून देणे लागतो, त्यांची पुढील अडचण सोडविणे हे कर्तव्यच आहे. काम करताना भावनिक नाते निर्माण झालेले असते हे नाते कायद्याच्या चौकटीत राहून सोडविण्याचा मनापासून प्रयत्न केला आहे. जून २०२३च्या अगोदर मयत झालेल्या गटसचिवांचा विषय त्वरित निर्णय दिला आहे. जून २३ नंतरच्या मयत सचिवांचा विषय १ ते २ महिन्यात सोडविला जाईल. सेवानिवृत्त सचिवांच्या बाबतीतही सर्वतोपरी मदत करणार आहे, असे सोलापूर जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड यांनी म्हटले आहे.

किरण गायकवाड यांची सकारात्मक भूमिका

पती अचानकपणे गेल्याने घरावर मोठे आर्थिक संकट कोसळले होते.घरखर्च भागवणे अवघड झाले आहे, एक मुलगा आणि एक मुलगी असल्याने ६४ हजाराची मदत आमच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची आहे. पुढील कौटुंबिक गरज भागविण्यासाठी वापर करण्यात येणार आहे.

- रूपाली गायकवाड
वरवडे, तालुका माढा.

५६ लाखांच्या बनावट नोटा प्रकरणी चौघांना अटक

टेंभुर्णी पोलिसांची कामगिरी : आरोपींना उद्यापर्यंत पोलीस कोठडी

सोलापूर/प्रतिनिधी

झटपट पैसे कमवून मोठे व्हायच्या उद्देशाने बनावट नोटा बनवून चलनात आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातून दोघांसह चौघांना टेंभुर्णी पोलिसांनी मुसक्या आवळल्या आहेत. त्यांच्याकडून ५६ लाख रुपयांच्या बनावट नोटांसह कार, नोटा छापाईचे प्रिंटर, कॉम्प्युटर आदी साहित्य असा - एकूण ६२ लाख ९ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. टेंभुर्णी पोलीस पथकाला बनावट नोटा प्रकरणात मुळापर्यंत पोहचण्यात यश आले आहे.

चलनात बनावट नोटा खपवण्यासाठी आलेल्या लक्ष्मीकांत शंकरआप्पा अळगी व सागर मच्छिंद्र बारवकर या दोघांना टेंभुर्णीजवळील पंढरपूर ब्रीजखाली पकडण्यात आले होते. त्यांच्याकडून ४८ हजार रुपयांच्या बनावट नोटा जप्त केल्या होत्या. या आरोपींनी दिलेल्या माहितीनुसार, पथकाने बागलकोट जिल्ह्यातील नवानगर भागातील संशयित आरोपींच्या घरी तपासणी केली. करबसय्या वीरभदय्या हिरेमठ (वय ३९, मूळ रा.युटुर्गी भटनूर ता. सिंदगी जि. विजापूर) हा घरातच नोटा छपात होता. त्याच्या घरातून बनावट नोटा व त्यासाठी लागणारे साहित्य जप्त करण्यात आले.

टेंभुर्णी : कर्नाटकात आरोपीच्या घरातून पोलिसांनी जप्त केलेल्या बनावट नोटा.

उमानगरीतील नाल्यात दुचाकीसह पडलेल्या इसमाचा मृत्यू

सोलापूर/प्रतिनिधी

मुरारजी पेठ येथील उमा नगरीतील नाल्यात दुचाकीसह पडलेल्या इसमाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

राजअहमद सलीम शेख (वय ३४, रा. मनोहर, निराळे वस्ती, सोलापूर) असे मयत व्यक्तीचे नाव आहे. उमा नगरी येथील मारुती मंदिरालगत असलेल्या नाल्यामध्ये दुचाकीसह एक इसम पडल्याची माहिती मिळाली. त्या पोलिस घटनास्थळी दाखल झाले. हा इसम बेशुध्द अवस्थेत मिळून आला. सकाळी ७.३५ वाजता अग्निशामक दलाच्या चार जवानानी त्यास बाहेर काढले. फौजदार चावडी पोलीस ठाण्याच्या पोलिसानी त्यास सोलापूर शासकीय रुग्णालयात दाखल केले असता उपचारापूर्वीच इसम मयत झाला. उमा नगरी येथील नाल्यामध्ये दुचाकीसह एक इसम नाल्यात पडल्याची माहिती मिळाली. तत्काळ अग्निशामक दलाचे चार जवान दाखल झाले. त्यास बाहेर काढले, अशी माहिती महापालिका अग्निशामक दलाचे प्रमुख राकेश साळुंखे यांनी दिली. उमा नगरी येथील नाल्यावरील पुल अरुंद आहे. त्यातच या पुलाला संरक्षक कठडा नाही. यामुळे रात्री अंधारात अंदाज न लागल्याने वाहने थेट नाल्यात जाण्याची भीती आहे. त्यामुळे या पुलावर संरक्षक कठडा बांधावा. तसेच हा पुल फार वर्षांपूर्वी बांधला आहे. वर्दळ वाढली आहे. तेव्हा या पुलाची रुंदी वाढवण्याची मागणी होत आहे.

गैर कृत्यास मनाई केल्याने ठरलेले लग्न मोडले

सोलापूर : गैरकृत्यास मनाई केल्याने संतापलेल्या नियोजित वराने वधू बरोबरची काडीमोड घेतली.आणि ठरलेले लग्न मोडले.

परवेश शेख या नियोजित वराची पिडीत तरुणी बरोबर विवाह जमला होता. नियोजित वधुस सात रस्ता येथे एका हॉलमध्ये बोलावले होते. त्या ठिकाणी त्याने तिचा विनयभंग करत शरीर सुखाची मागणी केली. त्यास त्या वधूंनी नकार दिल्याने नवऱ्याने काडीमोड घेतला. यावेळी दोन्ही कुटुंबात शिवीगाळ व मारहाण झाली. या प्रकरणी गुन्हा दाखल केला.

प्रदेश सरचिटणीसपदी ॲड. देशमुख यांची निवड

नातेपुते/प्रतिनिधी

येथील ॲड. रणवीर अमरशील देशमूख यांची महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष जयंतराव पाटील यांच्या मान्यतेने राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या प्रदेश सरचिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली असून त्यांना मूंबई येथे राज्याचे यूवक अध्यक्ष मेहबूब शेख याच्या हस्ते पत्र देण्यात आले.

पद्मविभूषण खा. शरदचंद्र पवार यांच्या विचारानुसार पुढील काळात राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार, माझी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील खासदार धैर्यशील मोहिते पाटील सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष बाबाराजे देशमुख यांच्या माध्यमातून सर्वसामान्य युवकांच्या विकासात आपण भरीव कार्य करून ,पक्ष संघटना मजबुतीने उभी करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे देशमूख यांनि सांगितले. सदर निवडीबद्दल सामाजिक राजकीय शैक्षणिक क्रीडा क्षेत्रातील तसेच इतर संस्थेतील पदाधिकारी यांनी रणवीर देशमुख यांना शुभेच्छा दिल्या.